# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/१२/२०२५ (रविवार )**

---

## पोलीस स्टेशन पारशिवनी पोलिसांनी आंतरराज्यीय चोरासह अवघ्या ७२ तासांच्या आत हस्तगत केले चोरीच्या गुन्ह्यातील ट्रक.

**पोस्टे पारशिवनी:–** दिनांक २४/१२/२०२५ रोजी रात्री आठच्या सुमारास पारशिवनी तालुक्यातील सावळी येथिल इंडियन ऑईल पेट्रोल पंपावर पार्क करुन ठेवलेला गिट्टीने भरलेला टाटा कंपनीचा बारा चक्का टिप्पर क्रमांक MH 40 DB 7711 तेथुन दिनांक २५/१२/२०२५ च्या पहाटे एक–दीड वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरटयांनी चोरी करुन नेला. सदर प्रकरणी फिर्यादी नामे श्री. अंकित किसन घंगारे, वय २९ वर्ष, रा. घाटकुकडा, ता. पारशिवनी सध्या रा. पारशिवनी यांच्या तक्रारीवरुन पारशिवनी पोलीस ठाणे येथे अप क्र. ६११/२०२५ भा.न्या.सं, कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरु होता.

गुन्हा दाखल होताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये पोलीस स्टेशन पारशिवनी येथील पथकाने आरोपीचा कसून शोध घेणे सुरू केले व महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, दिल्ली अशा पाच पेक्षा जास्त राज्यांमध्ये आरोपी व चोरीस गेलेल्या ट्रकचा शोध घेत सतत खापा, सावनेर, बैतुल, बैसरवाडा, कनोद, आष्टा, देवास, इंदौर, उजैन, बुंदी, दौसा, दिल्ली, नूह असा प्रवास करून मार्गातील एकुण ३५ टोलनाक्यावरील अंदाजे २०० सीसीटीव्ही कॅमेराचे फुटेज तपासुन तसेच तांत्रिक पुराव्याच्या आधारे मिळालेल्या माहितीवरून पारशिवनी पोलीस हरियाणा येथील पडवल जिल्ह्या पर्यंत पोहोचल्यानंतर नागपूर ग्रामीण जिल्हयाचे वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी हरियाणा राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ संपर्क करून पारशिवनी पोलीस पथक तसेच हरियाणा येथील CIA पथकाच्या माध्यमाने पोलीस स्टेशन हातिनच्या हद्दीमधुन **आरोपी नामे प्रदीप जगदीश सासही, वय ३० वर्ष, रा. सुलचानी, ता. नारनोंद कपेज हिस्सार** याचे कडून गुन्ह्यात चोरीस गेलेला १२ चक्का टिप्पर ट्रक क्रमांक MH 40 DB 7711 हस्तगत केला.

सदर गुन्हयाच्या तपासात मा. पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार व मा. अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रमेश बरकते व ठाणेदार श्री. राजेशकुमार थोरात यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक रामराव पवार, पोहवा मुदस्सर जमाल, पोलीस नाईक वीरेन्द्र नरड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पर्यावरणास अपायकारक व मानवी जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २७/१२/२०२५ रोजी पर्यावरणास अपायकारक व मानवी जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर, कळमेश्वर यांनी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन असा एकुण १०,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

१) पोस्टे सावनेर अंतर्गत दिनांक २७/१२/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, वार्ड क्र १३ किल्लापुर सावनेर येथे **अभिषेक विजय कछवाह, वय १९ वर्ष, रा. वार्ड क्र १३ किल्लापुर सावनेर** हा आपले राहते घरी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सावनेर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि आरोपीच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता घराचे एका कोपऱ्यात प्लास्टिक थैलीमध्ये एकुण १४ नग नायलॉन मांजा प्लॅस्टीक चक्री किंमती ९,८००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम १२५, २२३ भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

२) दिनांक २७/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोस्टे कळमेश्वर अंतर्गत बाजार चौक, कळमेश्वर येथे **सागर दिलीप भस्मे, वय २४ वर्ष, रा. कळमेश्वर, वार्ड क्र. ५** हा आपले राहते घरी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पथकाने तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि आरोपीच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून नॉयलॉन मांजाची प्लास्टीक चकरी किंमती ६००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## ०४ बैल जनावरांची सुटका, जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :– दिनांक २७/१२/२०२५ रोजी जलालखेडा पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी सदर वाहन शोध कामी पेट्रोलींग केली असता मौजा मोवाड फाटा जलालखेडा येथे एक संशयीत पिकअप क्र एम पी– ०४/ जी बी –२४८० हे वाहन दिसुन आले. नमूद घटनास्थळी पिकअप वाहन दिसताच त्या वाहनाला थांबवण्याचा इशारा केला असता तो भरधाव वेगाने न थांबता पळून जाण्याचा प्रयत्न करित असता सदर वाहनाचा पाठलाग करून वाहन थांबविले. वाहनाचे चालकास नाव व पत्ता विचारले असता १) **चालक आरोपी नामे परवेज शाह अफसर शाह, वय २२ वर्ष, रा. आमनेर, ता. वरूड, जि. अमरावती** असे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०४ बैल जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून पिकअप क्र एम पी– ०४/ जी बी –२४८० किंमती ५,००,०००/– रूपये आणि ०४ बैल जनावरे किंमती ४०,०००/– रूपये असा एकुण किंमती ५,४०,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

नुमद प्रकरणी वाहन चालक आरोपीविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या अंमली पदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोस्टे रामटेक** :—दिनांक २६/१२/२०२५ ते दिनांक २७/१२/२०२५ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असता मौजा मनिबुवा मठाजवळ, शनिवारी वार्ड, रामटेक येथे दोन संशयित इसम दिसुन आले. संशयित इसम पोलीस वाहनास पाहुन पळु लागले. त्यामुळे सदर इसम नक्कीच काहीतरी संशयास्पद असल्याचे पोलीसांना संशय आल्याने सदर इसमांचा पाठलाग करुन सदर इसमांना ताब्यात घेवुन नाव व पत्ता विचारले असता **१) राम खुशाल गराडे, वय ३८ वर्षे, रा. शनिवारी वार्ड, रामटेक २) सलिम शेख, रा. कामठी, जि. नागपूर** असे सांगितले. पोलीसांनी दोन्ही आरोपीची झडती घेतली असता नमुद झडतीमध्ये दोन्ही आरोपीतांचे जवळ १) हिरवट काळसर रंगाचा ओलसर गुंगीकारक वनस्पती गांजा वजन १७२ ग्रॅम किंमती ४,०००/— रू. २) एक पिवळया रंगाची प्लास्टिक पिशवी ३) एक जुनी वापरती काळसर रंगाची ज्यावर लाल रंगाचे पत्याची डिझाईन असलेली कापडी पिशवी किं. ००/रू. ४) एक आकाशी रंगाचा सॅमसंग गॅलेक्सी ए. १५ मोबाईल किंमती १५,०००/— रू. असा एकूण १९,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०२ गुन्हे नोंद. एकुण ११५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २७/१२/२०२५ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन उमरेड, कुही यांनी अवैधरित्या सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सटट्ापटट्ी साहित्य व नगदी असा एकुण १,१५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत उदासा पुलीया खाली **आरोपी नामे— बाळाकृष्ण सोमाजी शेंडे, वय ५५ वर्ष, रा. उदासा उमरेड** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतानां मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ४२०/—रूपये असा एकुण ४२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मौजा कुही येथे **आरोपी नामे आशिष आनंद लांजेवार, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र ०६, भोलाहुडकी, ता. कुही जि नागपुर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून सट्टापट्टी साहीत्य व रोख रक्कम ७२५/—रू. असा एकुण ७३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे दिनांक २४/१२/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ रोजीपर्यंत राबविण्यात येत आहे ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह ,अवैध दारू बाबत विशेष मोहीम

## विशेष मोहीमे अंतर्गत करण्यात आल्या मोटर वाहन अधिनियम अन्वये २२९ कारवाई आणि अवैध दारू बाबत १५ गुन्हे दाखल

**नविन वर्षानिमीत्त नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २७/१२/२०२५ रोजी मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या ४२ कारवाई, तसेच विना हेल्मेट, विना परवाना, ओव्हर स्पीडच्या आणि इतर १८७ कारवाई अशा एकुण २२९ कारवाई केल्या आहे.**

त्याचप्रमाणे सदर विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २७/१२/२०२५ रोजी अवैध दारू विक्रेते, दारू काढणारे तसेच सेवन कारणाऱ्यांवर कारवाई करत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये विविध पोलीस स्टेशन अंतर्गत **एकुण १५ गुन्हे नोंद** करण्यात आले असुन सदर कारवाईत १३९५० मिली देशी दारु, ११० लीटर मोहाफुल दारू, ९३० लीटर मोहाफुल सडवा तसेच इतर साहीत्य असा **एकुण ५५,७५०/— रूपयांचा मुद्देमाल** जप्त करून **एकुण १५ आरोपी** यांविरूद्ध गुन्हे नोंद करण्यात आलेले आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

**मद्यप्राशन करून वाहन चालवितांना चालक मिळून आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन कायदया अन्वये कारवाई करण्यात येईल सदर प्रकरणात मा न्यायालयाकडुन १०,०००/— रूपयांपर्यंत दंड होवु शकतो. नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे संपुर्ण जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नववर्ष, तसेच इतर सणोत्सव आनंदात साजरा करावा परंतु स्वसुरक्षा म्हणुन वाहन चालवितांना मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, हेल्मेट चा वापर करावा, वाहतुक नियमांचे पालन करावे.  तसेच पालकांनी त्यांच्या अल्पवयीन पाल्यांना दुचाकी मोसा/चारचाकी वाहन चालविण्यास देवू नये अन्यथा चालकांविरूद्ध मोटार वाहन कायदयांन्वये गुन्हे दाखल करून कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने